INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
(Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal)
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

मराठी कादंबरीतील शिक्षण व्यवस्थेचे स्वरुप

निलेश साहेबराव सोनवणे
संशोधक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
E-mail: nilesh.sonawane634@gmail.com

DOI No. 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/07.2021-48735915/IRJHIS2107027

प्रस्तावना :

सध्याच्या काळात माणसाचे जीवन हे गतीमान व विकसनशील झाले आहे. साधारणत: हा विकास शिक्षणातून होतो. शिक्षणाचा मुख्य हेतू, व्यक्ती, कुटूंब, समाज, राष्ट्र व संपूर्ण विश्वाची प्रगती करणे हा आहे. शिक्षणाला व्यक्तिमत्त्व व जीवन विकासाचे साधन मानले जाते. आज शिक्षण ही मानवी जीवनाच्या मूलभूत गरजांपैकी एक प्रमुख गरज बनली आहे. बदलत्या समाज जीवनामध्ये शिक्षणाला दिवसेंदिवस अधिक महत्त्व प्राप्त होत आहे. शिक्षण ही दीर्घ व अखंड चालणारी प्रक्रिया आहे. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत शिक्षणाची क्रिया चालू असते. अशा शिक्षण व्यवस्थेचा अभ्यास करताना ही व्यवस्था काही महत्त्वपूर्ण टप्प्याच्या अनुषंगाने विकसित झाल्याचे लक्षात येते.

शिक्षणाचे स्वरूप काळानुसार बदलत आले आहे. शिक्षणामुळेच मानवाचा शारीरिक, मानसिक, बौध्दिक आणि नैतिक विकास होतो. जोतीराव फुले शिक्षणास, 'मनुष्याचा तिसरा डोळा' असे म्हणतात. त्यानुषंगाने मराठी कादंबरीतील शिक्षण व्यवस्थेत शिक्षणाचे स्वरुप, शिक्षणाची पूर्वपिठिका अभ्यासून त्यापूर्वी शिक्षणाचे महत्त्व समजून घेता येईल.

शिक्षणाचे महत्त्व :

आज 'शिक्षण' ही मानवी विकासाची पहिली आणि अनिवार्य अशी पूर्वअट आहे. मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास हा शिक्षणावर अवलंबून असतो. समाजाचा विकासही शिक्षणावरच अवलंबून असतो. किंबहुना समाज आणि शिक्षण यांचा परस्पर घनिष्ट संबंध असतो. शिक्षण हे समाजासाठीच असते आणि शिक्षणामुळेच समाज गतिशील आणि सुसंस्कृत बनतो. व्यक्ती आणि समाज यांच्या जडण-घडणीबरोबर देशाच्या प्रगतीसाठी, प्रभावी राष्ट्र बनविण्यासाठी शिक्षणव्यवस्था अधिक भक्कम असावी लागते. समाजास सुसंस्कृत करून प्रगतीचा परमोच्च बिंदू गाठण्यासाठी शिक्षणाचा साधन म्हणून वापर केला जातो. कोणत्याही समाजाचे जलदगतीने स्थित्यांतर घडवून आणण्यासाठी शिक्षणाचा प्रसार करणे अत्यावश्य असते. जोतीराव फुले म्हणतात, ''शिक्षणामुळे सत्य असत्याचा आणि अंतिम हिताचा विचार करण्याची शक्ती प्राप्त होते. स्वाभिमानाची जाणीव त्यांच्यात जागृत होते. म्हणून शिक्षण हे सर्व सुधारणेचे मुळ आहे.'' शिक्षणाने मानवाला शहाणपण येते असे त्यांचे ठाम मत होते. आद्य क्रांतिकारक आणि थोर शिक्षणतज्ज्ञ जोतीराव फुले मानवी जीवनात

शिक्षणा अभावी किती अनर्थ होतात याविषयी म्हणतात, ''विद्येविना मति गेली; मतिविना नीति गेली, नीतिविना मती गेली! गतीविना वित्त गेले, वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.''

शिक्षणाची गरज :

व्यक्तिला भोवतालच्या परिस्थितीचे ययार्थ आकलन होणे हे शिक्षणाचे प्राथमिक प्रयोजन असते. भ्रामक समजुती व अंद्धश्रद्धा या आकलनाच्या आड येतात. याचे निराकरण शिक्षणातून झाले पाहिजे यासाठी सर्वांना शिक्षणाची गरज आहे. भारतात मध्ययुगीन काळापर्यंत शिक्षण ही विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती. अशा प्रकारची मक्तेदारी संपुष्टात आणण्यासाठी सर्वसामान्य माणसाला काळाबरोबर अक्षर ओळख करून देणे म्हणजे त्याला साक्षर करणे व शिक्षणातून त्याला स्वत:चीच जाणीव करून देणे, माणूस म्हणून जगण्याला अर्थप्राप्त करून देणे गरजेचे वाटू लागले. अनेक समाज सुधारकांनी शिक्षणव्यवस्था निर्माण केली. यातूनच समाजातील वंचितांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, श्रीमंत आणि गरीब विद्यार्थ्यामधील अंतर कमी करून त्यांना समान पातळीवर आणणे, यासाठी शिक्षणाची आवश्यकता वाटली. एकूणच आपल्या वाट्याला आलेले दारिद्रय दास्य, दु:ख, अपमान, घृणा, तिरस्कार यातून मार्ग काढण्यासाठी शिक्षणाची नितांत गरज वाटू लागली. आजच्या स्पर्धेच्या युगातील आव्हाने पेलण्यास सक्षम पिढी निर्माण करणे, मुलींच्या शिक्षणाबरोबर महिला सक्षमीकरण करणे, प्रौढांना शिक्षण देणे, दूरशिक्षणाच्या माध्यमातून बहि:स्थ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी व त्यांना स्वत:च्या कामातून अपेक्षित शिक्षण मिळणे गरजेचे बनले. अशा प्रकारच्या गरजेतून वैयक्तिक विकासाबरोबर समाजविकास साधता येतो. सामान्य माणसाला त्याच्या हक्काबरोबर कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी शिक्षणाची गरज भासली. समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्य जपण्यासाठी शिक्षणाची गरज आहे.

शिक्षण संकल्पना व स्वरूप :

'शिक्षण' या शब्दाचा शब्दश: अर्थापेक्षा त्याचे व्यापक असे अनेक अर्थ सांगता येतात. 'शिक्षण' म्हणजे पुस्तकी ज्ञान, 'शिक्षण' म्हणजे सुसंस्कार, 'शिक्षण' म्हणजे पदवी मिळवणे, 'शिक्षण' म्हणजे स्वावलंबन, या संदर्भात स्वामी विवेकानंद, राजाराममोहन रॉय, गोपाळ गणेश आगरकर, जोतीराव फुले, गाडगे महाराज, धोंडो केशव कर्वे, महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, ईश्वरचंद्र विद्यासागर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख सर सय्यद अहमदखान इत्यादी आधुनिक विचारवंताच्या शिक्षणाच्या विविध व्याख्यांतून शिक्षणाने व्यक्तीला 'जाणीव' करुन दिली पाहिजे, असा अर्थ अभिप्रेत आहे. शिक्षण म्हणजे ज्ञान आणि विवेक यांचा सुरेख संगम होय. समाजसुधारकांनी शिक्षणासाठी केलेल्या भरीव अशा कार्यावरच आजची शिक्षणव्यवस्था उभी आहे. प्राचीन विचारवंताच्या दृष्टीने शिक्षण व शिक्षणव्यवस्थेची व्यापकता लक्षात घेता येते.

शिक्षण म्हणजे काय ?:-

शिक्षण ही एक व्यापक प्रक्रिया असून भारतीय व पाश्चात्य विचारवंतांनी शिक्षणाबाबत केलेल्या व्याख्या ह्यातून शिक्षण व्यवस्थांचे स्वरूप व संकल्पना स्पष्ट होतात.

व्याख्या :

१) **टॉमस हक्सली** यांनी, 'सर्वांग सुंदर जीवन जगण्याची तयारी म्हणजे शिक्षण' अशी व्याख्या केली आहे.

२) **बीड** यांनी 'शिक्षण म्हणजे विश्वाच्या उभारणीची योजना होय' असे म्हटले आहे.

३) **प्लेटो** यांच्या मते, 'सत्य, शिव व सुंदर ही जी जीवनाची अंतिम मूल्ये आहेत, ती समजण्याची व अनुभवण्याची पात्रता मनुष्याला आणुन देते, ते शिक्षण होय.'

शिक्षण म्हणजे जुन्या पिढीकडून नव्या पिढीकडे होणारे सर्व सामाजिक वारशांचे संक्रमण असेही काही विचारवंतांनी म्हटले आहे.

मराठी कादंबरीतील शैक्षणिक चित्रण :

मराठी कादंबरी आणि शिक्षण व्यवस्था यांच्यातील स्वरूप आणि संबंधाचा विचार करताना दोहोंचा जन्म जवळपास एकाचवेळी झालेला आहे. कारण शिक्षण आले म्हणूनच कादंबरीसारखे वाङ्मय आपणास मिळाले नाही तर शिक्षणाशिवाय त्याचे अस्तित्व ते काय?

'दिवे गेलेले दिवस'-रंगनाथ पठारे यांच्या कांदबरीतील ग्रामीण भागातील शिक्षणव्यवस्थेविषयी अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असे लेखन केले आहे.

'शाळा' ही मिलिंद बोकिलांची कादंबरी ह्यात ठाणे शहराजवळच्या शिक्षण व्यवस्थेचे चित्रण केले आहे. हयात ठाण्यातील डोंबिवलीतल्या एका शाळेचे वर्णन केले आहे.

'नामुष्कीचे स्वगत' या कादंबरीतील मराठी भाषा व आजची शिक्षण व्यवस्था दर्शवलेली आहे.

'Accidentally Educated' ह्या कादंबरीत पाश्चिमात्य शिक्षण पध्दतीचा सुरेख उल्लेख केला आहे.

'निशानी डावा अंगठा' : रमेश इंगळे उन्नादकर यांच्या कादंबरीत प्रौढ साक्षरता अभियान हा विषय रेखाटला आहे स्वातंत्र्यानंतर शिक्षण तळागाळापर्यंत पोहचले परंतु ज्यांना परिस्थितीमुळे, विविध अडचणीमुळे शिक्षण घेता आले नाही. त्यांच्यासाठी प्रौढ शिक्षण साक्षरता अभियान राबविले.

'बनगरवाडी' व्यंकटेश माडगुळकर यांच्या कांदबरीतून शिक्षण आणि शिक्षकांकडे बघण्याचा दृष्टीकोन रेखाटला आहे. समाज मात्र पोरांच्या शाळेबाबत उदासिन आहे. जनावरांच्या पाठीमागे जाण्यापेक्षा पोरांना शाळेत पाठविणे त्यांना मुर्खपणाचे वाटते.

'हाताची घडी तोंडावर बोट' ह्या माधव कोंडविलकर यांच्या कांदबरीत दलित विद्यार्थ्यांला दिलेल्या वागणुकीचे व शिक्षकांचा विद्यार्थ्यांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाचे चित्रण आले आहे.

'झोंबी' कादंबरीतील हळदीकर हे गृहस्थ आनंदाच्या वडिलांना म्हणतात, 'मुलगा हूशार आहे. शिकला तर त्याला चांगली नोकरी मिळेल. मग तुमच्या पोटा पाण्याचा प्रश्न सुटेल की, उलट तो चांगल्याप्रकारे सुटेल' (झोंबी क्र.१५२) यावरून समाजातील हळदीकरसारख्या लोकांचा सामान्य मुलांकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन दिसून येतो.

'आगळ' महेंद्र कदम यांच्या कादंबरीत शालेय परीक्षेला अनन्यसाधारण महत्त्व देणाऱ्या समाजाचे चित्रण येते.

दहावीची परीक्षा ही शालेय जीवनात अतिशय महत्त्वाची समजली जाते. यातून समाज शिक्षणाबद्दल किती जागृत आहे याची कल्पना येते.

एकुणच मराठी कादंबरीत लोकांचा शालेय शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन काळानुसार बदलत आहे.

निष्कर्ष :

१) सामाजिक विचारवंतांनी, तत्ववेत्यांनी आणि अभ्यासकांनी शिक्षणाच्या केलेल्या व्याख्यांतून 'शिक्षण' ही अतिशय व्यापक संकल्पना असल्याचे लक्षात येते.

२) प्राचीन विचारवंतांनी शिक्षणाकडे देशहित व राष्ट्रप्रेम निर्माण करणारी व्यवस्था आणि चारित्र्य संस्कार या अर्थाने पाहिले.

३) भारतीय विचारवंत शिक्षणात शरीर, मन आणि आत्मा याला प्राधान्य देतात. स्वावलंब, स्वकर्तृत्व, स्वाभीमान असा सुसंस्कारित, चारित्र्यवान, सूज्ञ नागरिक घडविणे म्हणजे शिक्षण अशी भारतीय विचारवंत शिक्षणविषयक भूमिका घेतात.

४) साधारणत: सहज शिक्षण, औपचारिक शिक्षण व अनौपचारिक शिक्षण असे शिक्षणाचे तीन प्रकार पडतात. अनौपचारिक शिक्षणाची गरज व शिक्षणाचा मुख्य हेतू, व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र व संपूर्ण विश्व याची प्रगती करणे हा आहे.

५) त्या दृष्टीने शिक्षणाची एक व्याख्या करता येते, 'माणसाला स्वत:ची जाणीव होऊन जगाबरोबर स्वत:ला गतिमान करणारा प्रगतीचा मार्ग म्हणजे शिक्षण होय.'

६) शिक्षण हे समाजासाठी असते आणि समाज शिक्षणामुळेच गतिशील आणि सुसंस्कारित होतो. समाजातील कुटुंबव्यवस्था, राज्यव्यवस्था आणि शिक्षणव्यवस्था यासारख्या मूलभूत व्यवस्थांमधून समाजाचा विकास होतो.

७) शिक्षण ही दीर्घ व अखंड चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे शिक्षणाचे झटपट परिणाम आपणास दिसून येत नसला तरी, शिक्षण म्हणजे भावी आयुष्याची तयारी या दृष्टीने शिक्षणाकडे पाहता येते.

समारोप :

'स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीतील शिक्षण व्यवस्था' अभ्यासत असतांना कादंबरीमधून समाजाच्या वृत्ती-प्रवृत्तीतून प्रकट होते. त्यामुळे काळाच्या पार्श्वभूमीची गडद छाया कादंबरीतून दिसून येते. म्हणून आजचे शिक्षण क्षेत्र व्यवहारिक भ्रष्टाचारी राजकारणातून उभे राहत आहे. याचा प्रभाव वाढत आहे. राजकारणाच्या अधिपत्याखाली चालणाऱ्या शिक्षणसंस्था गुणात्मक विकासापेक्षा मतलबी व स्वार्थाच्या भ्रष्टाचारी प्रवृत्तीतून प्रशासन करत आहेत. आजचे शिक्षणक्षेत्र संस्थाचालक, मुख्याध्यापक, शासन-प्रशासन आणि समाज यांच्या कचाट्यात सापडले आहे. म्हणून पूर्वीची शिक्षण व्यवस्था किती प्रभावी होती हे दिसते. आजच्या काळात कोणत्या शिक्षण व्यवस्थेची गरज आहे हे अभ्यासणे गरजेचे आहे. आणि यासाठी आजही कादंबऱ्यातून शिक्षणविषयक क्रांती होणे संयुक्तीक ठरेल. आजकाल इंटरनेटच्या अति वापरामूळे लोकांचा वाचनाकडे कल कमी होत चालला आहे परंतू चांगली मांडणी असलेल्या कादंबरीवर दर्जेदार मराठी चित्रपट बनत आहेत.

उदा. बनगरवाडी, शाळा, शिक्षणाच्या आयचा घो, निशाणी डावा अंगठा यासारखे चित्रपट शिक्षण व्यवस्थेबद्दल समाजजागृती करत आहेत.

संदर्भ सूची :

१) **रंगनाथ पठारे,** 'आजची कादंबरी-नोंदी आणि निरीक्षणे', शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, प्रथमावृत्ती जानेवारी २०१४, पृ. २५३

२) **एकनाथ पाटील,** 'कादंबरीच्या निर्मितीचा सुत्रशोध', दक्षिण महाराष्ट्र साहीत्य सभा प्रकाशन, प्रथमावृत्ती ११ मार्च २०२०, पृ. १९२

३) **चंद्रकांत बांदीवडेकर,** 'मराठी कादंबरी-चिंतन आणि समिक्षा', मेहता पब्लीशिंग हाऊस पुणे, प्रथमावृत्ती १९८३,

४) **मिलिंद बोकिल,** 'शाळा' कादंबरी, मौज प्रकाशन, प्रथमावृत्ती २००४, पृ. ३०३

५) **व्यंकटेश माडगुळकर**, 'बनगरवाडी', मौज प्रकाशन गृह, पृ. १३०

६) **आनंद यादव**, 'झोंबी', आत्मचरित्र, कादंबरी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पृ. ३८२

७) **रमेश इंगळे-उन्नादकर**, निशाणी डावा अंगठा, कथा, विनोदी, ग्रंथाली प्रकाशन, पृ. ३०३

८) **महेन्द्र कदम**, 'आगळ कादंबरी', लोकवाङ्मय गृह, पृ. २४४

९) **रंगनाथ पठारे**, 'चक्रव्युह कादंबरी', शब्दालय प्रकाशन,

१०) **रंगनाथ पठारे**, 'दिवे गेलेले दिवस कादंबरी' शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पृ. १२०